# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २९/०४/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. उमरेड :–** फिर्यादी यांची वय १७ वर्ष १० महीने अल्पवयीन मुलगी ही दि २६/०२/२०२२ रोजी सकाळी ०८.३० वा. सुमारास कॉलेजला जातो असे म्हणुन घरून निघुन गेली सायंकाळ पर्यंत ती घरी परत आली नाही. फिर्यादीने तिचे शाळेत विचारपुस केली असता ती शाळेत आली नाही असे माहीत पडले. तिचा शोधाशोध केली मिळुन न आल्याने सदर अल्पवयीन मुलीला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लाउन पळवुन नेले अश्या फिर्यादीचे तक्रारीवरून पो.स्टे. उमरेड ला अप क्र १४६/२२ कलम ३६३ भादवी अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयामध्ये कलम ३६६ अ, ३७६, ३४ भादवी सहकलम ४, २१, १ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायदा सहकलम १० बालविवाह प्रति अधि ३(१)(w)(I)(II), 3(2)(VA) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिंबधक अधिनियम या कलमांची वाढ करण्यात आली आहे. सदर गुन्हयात आरोपी क्र. १) लक्ष्मण रंगनाथ पोपळघट वय ५५ वर्ष, २) सौ मंगल लक्ष्मण पोपळघट वय ४५ वर्ष, ३) प्रशांत लक्ष्मण पोपळघट वय २८ वर्ष व ४) सौ प्रियंका प्रशांत पोपळघट वय २४ वर्ष सर्व रा. धामोरी बु ता राहुरी जि. अहमदनगर यांना अटक करण्यात आली आहे. तसेच मुख्य आरोपी नामे– प्रविण लक्ष्मण पोपळघट याचा शोध घेणे सुरू आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. उपविभागीय पोलिस अधिकारी श्री भिमराव टेळे सा. उमरेड विभाग उमरेड हे करीत आहे.

### रेती चोरी करणारा आरोपी अटक

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील माथनी टोल नाका येथे दिनांक २८/०४/२०२२ चे ०१.२० वा. ते ०२.०० वा. दरम्यान एमएच– ४०/सीडी– ९९९५ क्रमांकाचा ट्रॅक चा चालक आरोपी नामे– १. गौरीशंकर हरिचंद यादव, वय ३२ वर्ष, रा. डोंगरगाव ता. पोस्ट कुही जि. नागपूर व ट्रॅक मालक आरोपी नामे– २. अमोल कळबे यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या ५.५ ब्रास रेती किं. १६,५००/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण कि. १५,१६,५००/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई शुभम ईश्वरकर पो.स्टे. मौदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री चौधरी मो.क्रं. ७०३८८२२२०५ हे करीत आहे.

## फसवणुक

**१) पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ४ कि. मी. अंतरावरील करंभाड येथे दिनांक दि. २८/०४/२०२२ चे दुपारी १२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– विठोबा हागरू पाटील वय ८० वर्ष, रा. करंभाड हे आपले घराचे छपरीत एकटे बसले असतांना दोन अज्ञात आरोपीने त्यांच्या घरासमोर येवुन फिर्यादीला आवाज देवुन बाहेर बोहर बोलावुन ते बडोदा बॅकेतुन आलो आहे असे खोटे सांगुन फिर्यादीचे गळयात घातलेला सोन्याचा गोप हा असली आहे कि नकली आहे, असे विचारून फिर्यादीचे हस्ते सोन्याचा गोप गळयातुन काढुन घेउन दाखविला असतांना हातचालाखिने सोन्याचे सोन्याच गोप कि १,१०,५००/–रू चा मुद्देमाल घेउन पळुन गेले व फिर्यादीचे फसवनुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ४१९, ४२०, १७०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार चौधरी मो.क्र. ९८५०३३३५९५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :–अंतर्गत १ कि. मी. अंतरावरील दुयम निबंधक कार्यालय कळमेश्वर येथे दिनांक दि. २४/०७/२०१३ चे १२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– निलेश पढरीनाथ खोब्रागडे, वय ४५ वर्ष प्लॉट नं १६ जयवत नगर, नागपुर यांना आरोपी क्र. १. महेन्द्र वसंतराव उईके रा. शांती नगर, नागपुर, २. निलेश नारायण भांडारकर, रा. शांती नगर नागपुर, ३. नंदकुमार रामाजी कोठे रा. ब्राम्हणी कळमेश्वर व ४. पुडलिक रामाजी लोणारे वय ९० वर्ष, रा. कळंबी यांनी मौजा कांरली शिवारातील जमिन श्रीमती नर्मदादेवी राठी यांना विकलेली असतांना सुध्दा यातील आरोपी क्र १ ते ४ यांनी तिच जमिन यातील फिर्यादी कडुन १६ लाख रूपये घेवुन दि. २४.७.२०१३ रोजी सदर जमिनीची विक्रीपत्र करून देवुन अप्रमाणीकपणे फसवणुक करून खेटे दस्ताऐवज तयार करून यातील फिर्यादीला धमकी देवुन फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ५०६, १२० ब, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री मेश्राम मो.क्र. ९०७५२४५०५९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**